**-: प्रेस नोट :-** दिनांक २४/०१/२०२४

**‘‘ खुनाच्या गुन्हयात शिक्षा झालेल्या, कुख्यात गॅंगस्टार दाऊद इब्राहीम टोळीच्या नामचिन गुन्हेगाराला पॅरोल जंप करुन बेकायदेशिर अग्निशस्त्र बाळगल्याने मुंबई गुन्हे शाखेकडून अटक .’’**

.....................................................................................................................................

दिनांक २३/०१/२०२४ रोजी गुन्हे शाखेच्या कक्ष-९ यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती प्राप्त झाली की, एक संशयित इसम बेकायदेशिर शस्त्र बाळगुन असून तो ओशिवरा पोलीस ठाण्याच्या हददीत येणार आहे. त्याप्रमाणे ओशिवरा पोलीस ठाणे हददीतील अल्फा किड्स सेंटर बस स्टॉपजवळ, ओशिवरा, बॅंक रोड, अंधेरी (प), मुंबई ५३ या ठिकाणी कक्ष ९ च्या पथकाने सापळा रचून ०१ इसम नामे सचिन गजानन शेटे, वय ४५ वर्षे यास शिताफीने ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचेकडे खालील प्रमाणे शस्त्रास्त्रे मिळून आली.

१. एक लोखंडी देशी बनावटीचे पिस्टल.

२. चार जिवंत काडतुसे.

या बाबत त्याच्याकडे केलेल्या चौकशी मध्ये सदर अग्निशस्त्रे बाळगण्याचा कोणताही परवाना त्याच्याकडे नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच सदर इसमाकडे मिळून आलेल्या शस्त्र व काडतुसांचा वापर करुन तो पुढील काही दिवसांमध्ये मुंबई शहरात गुन्हेगारी कारवाया करण्याच्या तयारीत असल्याचे समजले. याप्रकरणी वर नमुद शस्त्र जप्त करुन नमुद आरोपी विरोधात गुन्हा क्र. ०७/२०२४ (डी. एन. नगर पोलीस ठाणे, गुरक्र. ११२/२०२४) कलम ३, २५ शस्त्र अधिनियम सह कलम ३७(१)(अ) १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. त्यात सदर आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास कक्ष ९ कडून करण्यात येत आहे.

आता पर्यंत केलेल्या तपासामध्ये सदर आरोपी याचेविरोधात पॅरोल जंप केल्याप्रकरणी मिरा रोड पोलीस ठाणे, येथे गु.र.क्र.४१६/२०२२, कलम २२४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद असून त्याचे विरोधात खुन, खुनाचा प्रयत्न, खंडणी, अग्नीशस्त्रे बाळगणे असे अनेक गुन्हे नोंद असल्याची माहिती मिळून आलेली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, पोलीस उप-आयुक्त (प्र-१), श्री. राज तिलक रौशन, सहाय्यक पोलीस आयुक्त (डी-पश्चिम), श्री. महेश देसाई यांच्या मागदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक, श्री. दया नायक, पो.नि. श्री. सचिन पुराणिक, पो.नि. श्री. दिपक पवार, स.पो.नि. श्री. उत्कर्ष वझे, स.पो.नि. श्री. महेंद्र पाटील, पो. ह. सुहास खडपकर, दत्तात्रय कोळी, राहुल पवार, विनय चौगुले, पो.शि.क्र. प्रशांत भुमकर, शार्दुल बनसोडे, राकेश कदम, पो. ह. चा. विनायक परब यांनी पार पाडली आहे.